कुपोषणामुळे समस्या गेल्या अनेक वर्षापासून भारताला भेडसावत आहे. शिक्षण, विज्ञान, लोकजागृती, शासनाच्या योजना इत्यादीमुळे यात घट झाली आहे, तथापी जोपर्यंत देशात गरिबी राहणार तोपर्यंत कुपोषणाचे समूळ उच्चाटन होईल असे वाटत नाही. कुपोषणाला विशेषतः महिला व लहान मुले बळी पडतात. साधारणपणे गरोदरपणात अथवा तत्पुर्वी स्त्रिला मिळणाऱ्या अन्नातून २२०० उष्मांक (कॅलरीज) मिळणे गरजेचे असते. स्तनदा मातेसाठी ३००० उष्मांकांची गरज असते. त्याचप्रमाणे आहारातून पुरेशा प्रमाणात प्रथिने, कॅल्शियम, मॅग्नेशियम, लोह जस्त, आयोडिन, जीवनसत्वे (अ,ब,क,ड,ई) इत्यादी पुरेशा प्रमाणात उपलब्ध व्हायला हवीत. मात्र ज्या कुटुंबांना पोटभर भाकरीच मिळत नाही किंवा जेवणात भाकरी बरोबर फक्त मीठ, मिरचीचा सातत्याने अंतर्भाव असतो त्यांना फळे, भाज्या, तृणधान्ये, दुध, मांस, मासे, अंडी हे घटक कसे काय उपलब्ध होतील? 'भुकेला कोंडा व उशेला धोंडा' या म्हणीप्रमाणे घोटभर दुधापासून पातेलेभर चहा तयार करून पिणाऱ्या गर्भवती महिलेस दररोज १०० ते २०० ग्रॅम दूध कसे काय मिळणार ? म्हणून कुपोषणाचा विचार केला तर एकट्या मेळघाटात मागील दहा वर्षांत सात हजार बालमृत्यू झाल्याचे वृत्त आपण वाचतो. या ठिकाणी तीस हजार बालके कुपोषणग्रस्त असल्याचे स्वयंसेवी संस्थांचे म्हणणे आहे.

### कुपोषण म्हणजे काय?

कुपोषण म्हणजे बाळाचे वजन त्याच्या वयास अनुसरून योग्य प्रमाणात नसणे. अशा प्रकारचे वय व वजन यांचे तक्ते उपलब्ध आहेत. या तक्त्यांप्रमाणे बाळाचे वजन नसल्यास ते किती प्रमाणात कमी आहे. हे लक्षात घेऊन, ८० टक्क्यापेक्षा कमी वजन असल्यास बाळ कुपोषीत आहे, असे समजले जाते. जन्मतः बाळाचे वजन कमी असणे हे कपोषणाचे एक कारण असले तरी शंभर टक्के ते कुपोषणच असते असेही नाही. जन्माच्या वेळी वजन कमी करण्याचे जगात १६ टक्के प्रमाण असून भारतात ते २६ टक्के आहे.

जन्मतः वजन कमी म्हणजे २.५ किलो ग्रॅमपेक्षा कमी वजनाचे बाळ बाळाच्या जन्म मुदतपूर्व झाल्यास वजन कमी असू शकते. गर्भधारणेच्या ३७ आठवड्याच्या आत बाळ जन्मल्यास त्याचे वजन कमी असले तरी योग्य पोषणाद्वारे २ ते ३ वर्षात त्याची योग्य वाढ होऊ शकते. मात्र योग्य पोषण न मिळाल्यास १/३ बालके कुपोषीत होतात. गर्भधारणेनंतर ३७ ते ४० आठवड्या दरम्यान म्हणजेच मुदतपूर्ण केल्यानंतर बाळ जन्मल्यास गर्भधारणेच्या कालावधीत मातेला योग्य पोषण आहार न मिहाल्यामुळेही बाळाचे वजन कमी भरते.

पुरेसा आहार न मिळाल्यामुळे बाळाचे कुपोषण होते. बाळ १ ते ३ वर्षाचे झाल्यावर हे स्पष्टपणे दिसून येते. अंगावरचे दूध बंद केल्यानंतर पुन्हा कुपोषण सुरू होते.

### कुपोषण कसे ओळखावे

१) वयाच्या व उंचीच्या मानाने बाळाचे वजन कमी असणे

२) बाळाच्या हातापायावर सुज असणे.

३) बाळाचे स्नायू आकसलेले (वाळलेले) दिसणे

४) शरिरातील त्वचेखालील व चेहऱ्यावरील त्वचेत चरबीचे प्रमाण नसणे.

५) मूलाने सतत किरकिर करणे, रडणे, कमी हालचाल करणे, अशक्त असणे.

६) वैद्यकीय तपासणीमध्ये बाळाची भूक, ताप, त्वचेवर सुरकुत्या, काळे डाग, लिव्हर सुजलेले, निस्तेज डोळे, खुंटलेली वाढ, मांसपेशी कमी होणे. अशी लक्षणे आहेत का हे तपासले जाते.

७) बाळाची रक्त व लघवी तपासून रक्तातील प्रथीने कमी/जास्त प्रमाण, लघवीतील युरोनियमच कमी प्रमाण, रक्तातील ॲमिनो ॲसीडचे वाढलेले प्रमाण तपासण्यात येते.

९) आईच्या आरोग्याच्या तक्रारी

१०) आईला दूध पुरेसे नसणे.

११) स्तनपान लवकर बंद करणे.

१२) बाळाच्या खाऊ घालण्याच्या चुकीच्या पद्धती.

१३) जाहिरातीला भूलून बाजारातील तयार अन्नपदार्थ बाळाला देणे.

१४)जन्मतःच बाळाला व्यंग असणे.

१५)आर्थिक शोसणामुळे उपासमारीला तोंड द्यावे लागणे.

१६) आहाराविषयी अज्ञान.

१७)बाळांतपणानंतर पहिल्या दोन दिवसातील आईच्या दुधात असणारे घटक बाळाच्या लसीकरणाचे काम करतात. काही वेळा गैरसमजूतीमुळे नवजात बालक या महत्वाच्या घटकास मुकतो.

१८) सामाजिक, धार्मिक, चाली, रूढी, परंपरा इत्यादी

१९) वैद्यकीय सोयींचा अभाव.

**पोषण व आहार**

**अ) अन्नाचे वर्गीकरण (उत्पन्नावरून)**

१) वनस्पतीपासून – गहू, डाळ, भाजी.

२) प्राण्यांपासून – अंडी, मटन, मासे.

**ब) अन्नाच्या घटकांचे वर्गीकरण**

१) प्रथिने

२) चरबी

३) शर्करायुक्त

४) जीवनसत्त्वे

५) खनिजे

**क) अन्नाचे कायर्त्तवरून वर्गीकरण**


१) शरीरबांधणी व वाढीसाठी अंडी, मासे, मटन

२) शक्तीवर्धक – साखर, तेल, तूप.

३) संरक्षण घटकयुक्त – दूध, फळे, पालेभाज्या

बाळाच्या आरोग्यासाठी वरील 'ब' व 'क' मधील सर्व घटक आवश्यक आहेत. यातील एकाची कमतरता कुपोषण घडवू शकते.

**प्रा. चंद्रशेखर तळेकर**
**राज्यशास्त्र विभाग**



# उच्च शिक्षण आणी जागतीकीकरण

बदल हा शिक्षणाचा नियम आहे. आणि या बदलाबरोबरच नवनवीन संधी तसेच नवनवीन समस्या व आव्हाने निर्माण होत असताना अशा प्रकारच्या बदलाचा एक भाग म्हणून जागतिकीकरणाची संकल्पना उदयास आली.

रूसी मोदीच्या मते, ''मुक्त स्पर्धा किंवा खुली स्पर्धा आणि नवे तंत्रज्ञान यातून उत्पादकता आणि उत्पादन वाढवीणे म्हणजे जागतिकीकरण होय'' तर मॅलकॉम एस.ॲडशियस यांच्या मते ''जागतिक अर्थव्यवस्था अस्थिस्वात आणण्यासाठी किंवा निर्माण करण्यासाठी जागतीक दृष्टिकोन निर्माण करणारी प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.'' (Globalization of the economy may be defined as global demension of the involiving world economy) जागतिकीकरणाच्या संकल्पनेच्या उदयाबरोबर विश्वाच्या कल्याणासाठी, समृध्दीसाठी नवनवीन संधी उदयास आल्या आहेत. या संधीबरोबरच या संकल्पनेने विश्वातील राष्ट्रांच्या पुढे नवनवीन आव्हाने किंवा समस्या निर्माण केल्या आहेत. उदारीकरण व खासगीकरण ही जागतीकिकरणाची प्रमुख साधने आहेत. जागतिकीकरणाला चालना देण्यासाठी अनेक बदल व उलथापालथी होऊन जागतीक व्यापार संघटना अस्तित्वात आली. कालांतराने या संघटनेत शिक्षण सेवेचा अंतर्भाव करण्यात आला. शिक्षणसेवेच्या जागतिकीकरणात भारतासारख्या विकसनशिल राष्ट्रापुढे काही संधी तर काही आव्हाने उभी राहीली आहेत.

**जागतीक व्यापार संघटन :- (WTO)**

बहुउद्देशीय व्यापार कराराद्वारे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे व्यवस्थापन करण्याच्या उद्देशाने १९४७ मध्ये व्यापार व जागतीकीकरणा विषयक सर्वसाधारण करार (GATT) अस्तित्वात आला.

**शिक्षणाच्या जागतिकीकरणाने भारतापुढे उभी केलेली आव्हाने :-**

* देशात उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था, महाविद्यालये, विद्यापिठे, व संशोधन संस्था यांच्याकडे असणाऱ्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणीक पायाभुत सेवा सुविधांची कमतरता कशी भरून काढावयाची ?

* देशातील शिक्षण संस्था, महाविद्यालये, विद्यापिठे, व संशोधन संस्था यांना आर्थिकदृष्ट्या स्वालंबी कसे बनवायचे ?

* कमी दरांमध्ये / खर्चामध्ये दर्जेदार शिक्षणाच्या सुविधा कशा उपलब्ध करून घ्याव्यात ?

* आर्थिकदृष्ट्या कमकुवत, मागासलेल्या व तळागाळातील घटकांना उच्च शिक्षणाच्या दर्जेदार संधी कशा उपलब्ध करून द्यावयाच्या ?

* देशातील उच्च शिक्षण क्षेत्रातील गुणवत्तेचा विकास कसा साध्य करावयाचा ? दर्जा सुधारण्यासाठी कोणते उपाय योजावेत ?

* आंतरराष्ट्रीय दर्जाचे अभ्यासक्रम कसे करावेत ? व त्यांची अंबलबजावणी कशी करावी ?

* जगातील विद्यार्थी वर्ग आकर्षित करण्यासाठी कोणत्या उपाययोजना राबवाव्यात ?

* आपल्या देशातील विद्यार्थीवर्ग परकिय विद्यापिठे व महाविद्यालयाकडे आकर्षित न होता स्वदेशीय विद्यापिठे व महाविद्यालयातुनच उच्च शिक्षण घेणे पसंत करणे गरजेचे आहे ?

* विदेशी महाविद्यालये, शिक्षण संस्था, विद्यापिठे व संशोधन संस्थांशी स्पर्धा करताना देशीय महाविद्यालये, शिक्षण संस्था, विद्यापिठे व संशोधन संस्था बंद पडणार नाहीत यासाठी खबरदारीचे उपाय म्हणुन कोणते प्रयत्न करावे ? इ.

**शिक्षणाच्या जागतिकीकरणामुळे भारतापुढे उभे केलेली आव्हाने :**

* देशात उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था, महाविद्यालये, विद्यापिठे व संशोधन संस्था यांच्याकडे असणाऱ्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक पायाभुत सेवा सुविधांची कमतरता कशी भरून काढायची ?

* देशातील शिक्षण संस्था, महाविद्यालये, विद्यापिठे व संशोधन संस्था यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी कसे बनवायचे ?

* कमी दरामध्ये / खर्चामध्ये दर्जेदार शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात ?

* आर्थिकदृष्ट्या कमकुवत, मागासलेल्या व तळागाळातील घटकांना उच्च शिक्षणाच्या दर्जेदार संधी कशा उपलब्ध करून द्यावयाच्या ?

* देशातील उच्च शिक्षण क्षेत्रातील गुणवत्तेचा विकास कसा साध्य करावयाचा ? दर्जा सुधारवण्यासाठी कोणते उपाय योजावेत ?

* आंतरराष्ट्रीय दर्जाचे अभ्यासक्रम कसे तयार करावेत ? व त्याची अंमलबजावणी कशी करावी ?

* उच्च शिक्षणामध्ये अत्याधुनिक दळणवळणाच्या साधनांचा उपयोग कसा करावयाचा ?

* जगातील विद्यार्थीवर्ग आकर्षित करण्यासाठी कोणत्या उपाययोजना राबवाव्यात

* आपल्या देशातील विद्यार्थीवर्ग परकिय विद्यापिठे व महाविद्यालयाकडे आकर्षित न होता स्वदेशीय विद्यापीठे व महाविद्यालयातुनच उच्च शिक्षण घेणे पसंत करेल यासाठी कोणते प्रयत्न करणे गरजेचे आहे

* विदेशी महाविद्यालये, शिक्षण संस्था, विद्यापिठे व संशाधेन संस्थाशी स्पर्धा करताना देशीय महाविद्यालये, शिक्षण संस्था, विद्यापिठे व संशोधन संस्था बंद पडणार नाहीत यासाठी खबरदारीचे उपाय म्हणुन कोणते प्रयत्न करावे ? इ.

**शिक्षणाच्या जागतिकीकरणाने भारतापुढे निर्माण झालेल्या संधी :**

* सर्वांसाठी शैक्षणिक संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध करूण देण्यासाठी भांडवलाचा पुरवठा करणे

* शिक्षणाचा दर्जा सुधारेल.

* स्पर्धा चांगल्या सेवेची खात्री देईल.

* समाजाचा आर्थिक आणि सामाजिक विकास.

* अधिक कुशलता प्रधान.

* ई – विद्यापिठे

* जगातील शिक्षण संस्थांची ओळख करून दिली जाईल.

* किंमत परिणाम नफा प्रधान शिक्षण

* तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणाच्या / वहनाच्या

संधी

* शैक्षणिक सेवांची परिपुर्ण बाजारपेठ

* माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर होईल.

* विकसित आणि विकसनशील राष्ट्रांमधील ज्ञान आणि तंत्रज्ञानातील दरी कमी होईल

* उपभोक्त्याचे समाधान आवश्यकच आहे. शिक्षण ही एक वस्तु होईल म्हणुन ग्राहक संबंध व्यवस्थापन (Customer Relationship Management) CRM दृष्टीकोन प्रत्यक्षात येईल.

* अनेक संशोधन आणि विकास बौध्दिक मालमत्ता हक्क (Intellectual Property Rights (IPRs)) तंत्रज्ञानातील परिवर्तन (Upgradation)

* परकिय चलनाच्या साठ्यात वाढ होईल.

* पर्यटन व्यवसायाचा विकास / वाढ होईल.

* जग हे जागतिक खेडे बनेल. (Global village)

* बहुसंस्कृतीवाद

* कुशलतेचा बाजार (Marketability Skills)

* प्रत्येक व्यक्ती एक उद्योजक आहे

* विकसित आणि विकसनशिल राष्ट्रांमधील दळणवळणाची दरी कमी होईल.

* शिक्षणातील विकासासाठी जागतिक विस्तृत जाळ्याचा (World Wide Web(WWW)) उपयोग होईल.

येणाऱ्या काळामध्ये भारतात सामग्रीची कमतरता जाणवेल तसेच जागेची आणि लोकाचीही कमतरता भासेल, आहे त्या वर्गखोल्यांची संख्या कमी पडेल अशा वेळी (GATs) व्दारे उपलब्ध झालेल्या संधीचा फायदा घेऊन भारतीय उच्च शिक्षणाचा विकास करायला भारताला संधी आहे. (GATS) ला समर्थपणे तोंड देण्यासाठी भारताकडे असलेल्या काही जमेच्या बाजु/सकारात्मक बाजुः

* इंटरनेट सेवा पुरविण्याच्या स्पर्धेत गुवणत्तेच्या दृष्टीकोनातुन भारताला जगात २६ चा क्रमांक आहे.

* माहिती व दळणवळण तंत्रज्ञानातुन शासनाला होणाऱ्या नफ्याच्या बाबतीत जगात १२ व्या क्रमांकावर आहे.

* माहिती व दळणवळण तंत्रज्ञानातील उद्यांकामध्ये शासनाच्या यशस्वीतेच्या बाबतीत जगात १६ वा क्रमांक लागतो.

* माहिती व दळणवळण तंत्रज्ञानाशी संबंधीत कायद्याच्या बाबतीत जगात १६ वा क्रमांक लागतो.

* शैक्षणिक पद्धतीच्या दर्जांच्या बाबतीत जगात ३६ वा क्रमांक

* विशेष संशोधनासाठीच्या आणि प्रशिक्षण सेवांच्या स्थानिक उपलब्धतेच्या बाबतीत भारताचा जगात २६ वा क्रमांक लागतो.

* व्यवस्थापन शाळांच्या गुणवत्तेच्या बाबतीत भारताचा जगात ८ वा क्रमांक लागतो.

* तंत्रज्ञानातील सुलभतेसाठी भारताचा जगात २५ वा क्रमांक लागतो.

* ब्रेन ड्रेनच्या बाबतीत भारताचा जगात ६५ वा क्रमांक लागतो.

* संशोधन आणि विकास क्षेत्रावर भारताचा

जगात ३९ वा क्रमांक लागतो.

* शास्त्रज्ञ व अभियंत्यांच्या उपलब्धतेच्या बाबतीत भारताचा जगात ३ रा क्रमांक लागतो.

* गणित आणि विज्ञान शिक्षणाच्या बाबतीत भारताचा जगात १४ वा क्रमांक लागतो.

* परकियांची/विदेशांची थेट गुंतवणुक आणि तंत्रज्ञानाचे हस्तांतर करण्याच्या बाबतीत भारताचा जगात ३१ वा क्रमांक लागतो.

**शिक्षणाच्या जागतिकिकरणाला समर्थपणे तोंड देऊन त्याचे फायदे मिळविण्यासाठी योजाव्या लागणाऱ्या उपाययोजना:**

* उच्च शिक्षणाची गुणवत्ता उच्च प्रतीची ठेवणे.

* आंतरराष्ट्रीय दर्जाचे अभ्यासक्रम तयार करून राबवले पाहिजेत.

* संशोधनाचा दर्जा सुधारला पाहिजे. संशोधन हे विकासाभिमुख व नाविन्यपुर्ण असले पाहिजे.

* शिक्षणाच्या पायाभुत व आत्याधुनिक सेवा सुविधा उच्च शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्था, महाविद्यालये, व विद्यापिठातुन विकसित केल्या गेल्या पाहिजेत.

**सारांश:**

अनेक जागतिक उलथापालथीतुन जागतिक व्यापार संघटनेची स्थापना झाली असुन तिची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. जागतिक व्यापार संघटनेचे सर्वाधिक फायदे सुरुवातीला तरी विकसित राष्ट्रांना होणार यात शंका नाही. भारतासारख्या विकसनशिल राष्ट्राला जागतिक स्पर्धेत टिकुन राहुन जागतिक स्पर्धेची फळे चाखण्यासाठी अनेक संधी आहेत. त्यासाठी प्रथमतः जागतिक व्यापार संघटनेने उभी केलेली आव्हाने समर्थपणे पेलली पाहीजेत. भारत आर्थिक महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत असुन शिक्षण सेवाच्या जागतिक व्यापारातही काही ठोस उपाय योजुन मोठ्या प्रमाणात शिक्षण सेवांची निर्यात करून परकिय चलनाची प्राप्ती करू शकेल अशी आशा बाळगल्यास काही वावगे ठरणार नाही.

**प्रा. डॉ. अशोक कोरडे**
**(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)**



**मी देवाला विचारले,**
**तुला मनुष्याविषयी जास्त आश्चर्य का वाटते ?**
**देव उत्तरला,**
**मनुष्य पैसा मिळवीण्यसाठी आरोग्य गमावतो व**
**आरोग्य परत मिळविण्यासाठी तो सर्व पैसा खर्च करतो**
**तो भविष्याच्या काळजीत वर्तमान गमावतो,**
**त्यामुळे तो वर्तमानातही जगत नाही**
**व भविष्यातही जगत नाही.**
**तो असा जगतो की कधीच मरणार नाही**
**आणि असा मरतो की**
**कधी जगलाच नाही.**

# शिक्षणातील परिर्वतनाच्या दिशा

ज्याला आपण 'समाजकार्य ' असे म्हणतो ते सर्व, समाजातील विविध प्रश्नांभोवती गुंफलेले कार्य असते. समाजात प्रश्न असतात आणि त्यामुळे तत्संबंधित व्यक्तींचे जीवन विस्कळीत नि असमाधानी होते. अशा व्यक्ती या प्रश्नांवर आपले आपण उपाय शोधीतच असतात; सोडविण्याचा प्रयत्नही करतात. पण, तरीही ते सुटले नाहीत तर बहुधा 'आपले दैव', 'आपले नशीब' असे मानून हे असे प्रश्न हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग समजून स्वीकारतात.

समाजातील काही प्रश्न हे दीर्घकाल समाजात रूजलेले असतात. आणि ते ज्यांना सोसावे लागतात. त्या व्यक्तींच्या वा कुटुंबाच्या नि समाजगटांच्याही अवाक्याबाहेरचे असतात. अशावेळी, या प्रश्नांबाहेरच्या लोकांनी, संघटीत होऊन हे प्रश्न हाती घेण्याची गरज आहे. अशा व्यापक अथवा खोलवरच्या प्रश्नांची जाणीव होऊन ते प्रश्न सोडवणे ही जणू आपलीच गरज आहे असे मानून काहीजण ध्यास घेतात नि प्रश्नांना भिडतात, तेव्हाच खरेखुरे 'समाजकार्य' उदयास येते, असे म्हणता येईल. अजूनही भारतीय समाजात रेंगाळत असलेले अस्पृश्यतेचे नि जातीभेदांचे प्रश्न, गरीबीचे नि शोषणाचे प्रश्न, कालबाह्य झालेल्य धर्मसंस्थेचे पुनर्उत्थापनाने गतीमान केलेले प्रश्न, असे एक ना अनेक प्रश्न, कायद्याच्या चौकटीत आणूनही सुटत नाहीत. अशा वेळी संघर्षात्मक चळवळीच्या रेट्याने किंवा समाजप्रबोधनाच्या मंदवेगी मार्गाने सोडविणयाची दिशा पकडून कार्यरत व्हावे लागते. बूद्धिनिष्ठता, विवेकदृष्टी आणि वैज्ञानिक दृष्टकोन आपलासा करून या प्रश्नांवर आघात करणारी पिढी निर्माण व्हावी लागते. आणि ही दिशा युवापिढी घडविण्याची जबाबदारी 'शिक्षणा' ने पेलायची असते. भारतात इंग्रजी सत्ता दृढमुल झाल्यानंतर, म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या पुर्वार्धापासून, धर्मसुधारणा, समाजसुधारणा आणि आर्थिक सुधारणांचा एक प्रवाह येथे उदयास आला. इंग्रजी शिक्षणाने तयार झालेली पहिली-वहीली पिढी, हिंदुस्थानच्या समाजविश्लेषनाच्या कार्यात उतरली. आणि सुरवातीपासूनच येथील मंदगती समाजाच्या खोलवर रूजलेल्या दोषांना चव्हाट्यावर आणण्यास सुरवात केली. आपल्यात आलेली सजगता, विश्लेषणाची ताकद, आणि समाजपरीर्वणाची गरज ओळखण्याचे सामर्थ्य हे सर्व नव्या शिक्षणाने आणि इंगजी सत्तेने उघडलेल्या ज्ञानखिडकीमुळेच आपल्याला प्राप्त झालेले आहे, याची जाणिव होऊन तत्कालीन समाजसुधारकांनी शाळा-महाविद्यालये आणि एकूणच शिक्षणाच्या व्यवस्था नव्याने निर्माण करण्यावर भर दिलेला आढळुन येतो. सामाजिक परिवर्तनाचा मार्ग शिक्षणातून जातो हे त्यांनी ओळखले होते.

ब्रिटिशांच्या अंमलामध्ये आणि ब्रिटिशांच्या वेळोवेळीच्या धोरणांनुसार, स्वातंत्र्योत्तर काळातील धोरणांनी या व्यवस्थेला अगदी अपरिर्वनीय असे करून ठेवले आहे. ही औपचारीक शिक्षणव्यवस्था हाच शिक्षणाचा मुख्य प्रवाह मानला जातो. त्यामुळे कोणत्याही सामाजीक, आर्थिक कारणांमुळे शिकु न शकणाऱ्या मुलांना शिक्षणाकडे वळवणे, याचा अर्थ, या स्थिर झालेल्या शिक्षणव्यवस्थेत त्यांना आणणे असाच

प्रामुख्याने घेतला जातो. त्यांना 'चालू शिक्षणप्रवाहात आणणे' किंवा 'मध्यवर्ती शिक्षणप्रवाहात आणणे' असे शब्दप्रयोग या संदर्भात रूढही आहेत. अलीकडे, 'सक्तीचे नि मोफत शिक्षण', 'शिक्षणाचे सार्वत्रिकरण' किंवा 'सर्वांसाठी शिक्षण' अशा दृष्टिकोणातुन जेथे, न शिकणारी मुले मध्यवर्ती प्रवाहात येऊ शकत नाहीत, तेथे पर्यायी व्यवस्था, अनौपचारिक व्यवस्था, निर्माण केल्या जात आहेत. परंतू अडचण अशी आहे की, शिक्षण विस्तारासाठी खेड्या–पाड्यातून निर्माण केल्या जाणाऱ्या या अनौपचारीक व्यवस्थांतून दिले जाणारे शिक्षण आणि ते देण्याच्या पद्धती या मात्र तंतोतंत औपचारीक व्यवस्थेसारख्याच आहेत. फक्त फरक इतकाच की, औपचारीक व्यवस्थेत अधिक प्रमाणात शिकलेली नि प्रशिक्षीत झालेले शिक्षक असतात. हे ते 'पूर्ण वेळची ' शाळा चालवतात. तर अनौपचारीक पर्यायी व्यवस्थेतील शिक्षण हा तुलनेने अल्पशिक्षीत आणि प्रशिक्षण न झालेला असा असतो नि तो अल्पवेळ शिकवतो. यामुळे मुळातच शिक्षणाचा यथाकथीत दर्जा विचारात घेतला तर तो औपचारीक व्यवस्थेपेक्षा अशा तऱ्हेच्या अनौपचारिक व्यवस्थेत, कितीतरी कमी असतो. यावेळी आपण एका पेचात सापडतो. एकीकडे कोणत्याही कारणांमुळे का असेना, पण शिक्षणाची औपचारीक व्यवस्था, शिकू पाहणाऱ्या सर्वांना सामावून घेऊ शकत नाही., म्हणून अनौपचारीक पर्यायी व्यवस्था आपण निर्माण करू पाहतो. पण दुसरीकडे ही नवी व्यवस्था साधनसामग्रीने संपन्न करण्याचे अर्थिक धाडस न दाखवल्याने, पुन्हा त्यातुन वंचितांच्या शिक्षणाची कमकुवत व्यवस्थाच आपण निर्माण करीत असतो. असे पेच निर्माण होण्यामागे एक सामाजिक (आणि म्हणून शासकीय) मानसिकता आहे. समाजात, तुलनेने मागासलेला गट तो प्रामुख्याने राहत असलेला ग्रामिण, त्यातही दुर्गम असलेला भाग आणि स्वतःच्या हक्कांसाठी संघटन करणे आणि राजकिय आवाज उठवणे याची शक्तीही नसलेले समाजगट या सगळ्यांना, काहीही देताना, कमी किंमतीचे नि कमी दर्जाचे दिलेले चालते. अशी मानसिकता सामान्यतः आढळते. एवढेच नव्हे तर, यापेक्षा अधिक त्यांना द्यावे अशी त्यांनाच गरज नाही, असेही समर्थन यामागे उभे असते.

**प्रा. संकेत गांधी**
**(बी.सी.ए. विभाग प्रमुख)**

जे कठीण आहे ते सोपे करावे..
जे सोपे आहे ते सहज करावे..
जे सहज आहे ते सुंदर करावे..
आणि जे सुंदर आहे
त्यावर मनापासून प्रेम करावे ...

---

आपली दुःखं
१ % लोकांनाच सांगा,
कारण ५० % लोकांना त्याचं
महत्व नसतं, आणि
४९ % लोकांना दुःखं
झाल्याचा आनंद असतो.

# हुंडाबळी

हुंडा ही आजच्या समाजाला ग्रासणारी एक जीवघेणी समस्या आहे. उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत पुरातन काळापासून आजपर्यंत हुंड्याची ही अमानुष अघोरी रूढी चालू आहे. रामायण महाभारतासारखा महान ग्रंथातुनही हुंड्याची ही अमानुष प्रथा म्हणून उल्लेख केला आहे. इतकी ही प्राचीन रूढी आहे. हुंडा घेणे जेवढे वाईट तेवढेच हुंडा देणे हेही चुक आहे. म्हणजे हुंडा हा घेतला नाही पाहीजे व देणाऱ्यानेही हुंडा द्यायचा नाही.

प्राचीन काळापासून मुलीचा विवाह म्हणजे कन्यादान असे मानले जाते. त्यामुळे मुलीची सासरी पाठवणी करताना तीच्याबरोबर धन, धान्य, गाई इत्यादी गोष्टी दिल्या जात असत. परंतु हा सगळा मामला खुशीचा असे म्हणजे ते आपल्या मनावर असे द्यायचे की नाही. त्यांत कुठेही अडवणूक नसे आईवडीलांची संपत्ती वारसाहक्काने मुलाकडे जात असे तिच्यावर मुलींचा हक्क नसे. ही कमतरता दूर करण्यासाठी लग्नाच्या वेळी हुंडा दिला जाई हा एक प्रकार आईवडीलांच्या संपत्तीतील मुलीचा वाटा असतो.

आज मात्र या गोष्टीला पूर्ण विकृत वळण लागले आहे. मुलाचे म्हणजे घबाड मिळवणे अशी चुकीची समजूत झाली आहे. मानसातील मानव हरवला आहे. तो दानव झाला आहे. त्याच्यातील स्वार्थ भयंकर बोकाळला आहे. मग लग्नाच्या वेळी वाटेल त्या गोष्टीची मागणी केली जाते. अडलेले वधुपिते त्या गोष्टी कबुल करतात. स्वतःला विकुन कर्जबाजारी होऊन वराच्या मागण्या पूर्ण करतात. पण त्या भस्मासूराची भुक वाढतच जाते. मग लग्नानंतर मुलीचा छळ सुरू होतो. तीला आत्महत्येला प्रवृत्त केले जाते. वा तिची हत्या कली जाते. तो नराधम पुन्हा लग्न करतो हे सत्य आहे. आणि म्हणुनच नवरा बोहल्यावर उभा राहण्यास तयार म्हणजे पुन्हा नवे घबाड !

हे भयानक सत्य आहे आणि म्हणूनच हुंडा ही एक भयंकर समस्या आहे. हुंडा घेणे म्हणजे स्वतःला विकणे, स्वतःची किंमत करून घेणे आजकाल मुलिंनी आपली पात्रता सिद्ध केली आहे. अलीकडे अनेक घरांत असे दिसुन येते की, लग्न करून येणारी मुलगी घरात पोसते, घराच्या उत्पन्नात भर घालते अडीअडचणीत समर्थपणे ती घराला सावरते असे आहे. तर मग स्त्रीला भार का समजावे ? तिच्याकडूनच हुंड्याची अपेक्षा का?

कुटुंबातच स्त्री पुरूष समान असतात. पत्नीला अर्धांगीनी म्हटले जाते. पण प्रत्यक्ष मात्र पुरूषाला श्रेष्ठ समजतात. व स्त्रीला कनिष्ठ समजतात. समाजाच्या प्रत्येक व्यवहारात हेच वास्तव्य स्पष्टपणे दिसते हुंडा हे या वास्तव्याचे एक रूप आहे. या हुंड्यामुळे कित्येकदा अनेक कुटुंबे उद्‌धस्त झाली आहेत.

मुलींचा जन्म ही एक आपत्ती समजली जाते. तिला जगात येण्यास प्रतिबंध केला जातो. वा जगात आलेल्याला जगातून हद्दपार केले पाहीजे. हुंड्याला विरोध करणारा कायदा सरकारने केला आहे. पण तरी पिळवणुक चालूच आहे. या घातक समस्येविरूद्ध काही स्त्री संस्था आजही काम करत आहेत. समाजातील तळागाळापर्यंत प्रबोधनाचे कार्य पोचायला हवे.

हुंड्याच्या प्रथेचा नाश करण्यासाठी समाजात स्त्री पुरूष समानतेची दृष्टी निर्माण केली पाहीजे. केवळ हुंड्याचा विचार करता येणार नाही. समाजाच्या विचारधारणेच्या मुळाशी आपल्याला जावे लागेल. स्त्री ही पुरूषासारखीच माणूस आहे.

**कु. ढाकणे प्रणाली बापू**
**प्रथम वर्ष बी.सी.ए.**

# आर्थिक नियोजन काळाची गरज

अर्थशास्त्र हा विषय नसून एक शाखा आहे. अर्थशास्त्र समजून घेऊन अर्थ म्हणजे पैशाचा उपयोग हे एक शास्त्र आहे.

या शास्त्राचा चिकित्सक पणे अभ्यास करणारे भारताचे नोबेल पारितोषीक विजेते **अर्मत्य सेन** असो किंवा जागतिक मंदिच्या काळात योग्य नियोजन (अर्थिक) करणारे आपल्या भारताचे जगद्विख्यात प्राध्यापक, पंतप्रधन मनमोहन सिंग अथवा बांग्लादेशच्या ग्रामिण बँकेचे मोहम्मद युन्नुस असो अनेक अर्थतंज्ञांनी आपल्या परीने या शाखेचा अपयोग करून जगाचे कल्याण केले आहे.

मनुष्याच्या जिवनात सर्वांत उपयोगी असे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र महिन्याच्या पहिल्या हप्यात पगार घेणारा नोकरदार, दररोज गल्ला मोजणारे व्यापारी, कधीकधी काम करून मिळणारे रोजगार हे सर्वजण आपआपल्या परीने अर्थशास्त्राचा वापर करतात.

**उदा.** एक मोलकरीन महिनाभर काम करून रू. तिन हजार कमवित असेल, तिला नवऱ्याचा, मुलांच्या शिक्षणाचा खर्च, गॅस, किराणा, दवाखाना वगैरे इ. खर्च महिन्याच्या रोजगारातुन करावा लागतो.

महिन्याकाठी पगार घेणारा नोकरदार वर्ग महिन्याच्या पहिल्या व दुसऱ्या हप्यात खुष असतो, तिसऱ्या हप्यात त्याची खुषी थोडी कमी होते. शेवटच्या आठवड्यात त्याचे तोंड पाहण्यासारखे होते. जर अचानक दवाखाना लग्न किंवा इतर कार्यक्रम आल्यास नोकरदाराची पंचायत होते.

एका दिवसाला रूपये तिन लाख गल्ला घेणारा व्यापारी कायम चिंतेत असतो. कारण दररोज जरी गल्ला येत असेल तरी उधारी ही दिवसेंदिवस वाढतच असते. पण या संकटातुन वाट काढत तो अनेक ठिकाणी जागा पैसे गुंतवतो शेअर मार्केट मध्ये अनेक वेळा जुगारीसारखे पैसे घालतो.

अशा या अर्थशास्त्राचा खुप फायदा आहे. नियोजनपूर्वक जर पैशाची घडी बसविली तर सामान्य मानसाचे जीवन सुरळीत चालते. सरकारी सबसीडी, अनुदान या गाजर दाखविणाऱ्या योजना अर्थशास्त्र खल्लास करून टाकतात. एक गॅस टाकी मागे सरकार रू आठशे ची सबसीडी देते. रेल्वे दरवर्षी रू. तिस हजार कोटी तोट्यात असते. एस.टी. कधीही नफ्यात राहत नाही. सामान्य मनुष्य विचार करतो. एक जिपवाला याच पैशातुन नफा कमवू शकतो तर रोख पैशावाले या सेवा का नफ्यात येत नाही.

कांद्याचे अर्थशास्त्र न समजनारे आहे.पण आपल्या महाराष्ट्राच्या वतिने पंतप्रधान पदाचे उमेदवार श्री शरदजी पवार सांगतात फायदा झाला तर शेतकऱ्यांचा होऊ द्या पण त्यावेळी शेतकऱ्यांकडे कांदा नसतो. कांद्यात भरपुर पैसा म्हणून कांदा लावणारे शेतकरी विकताना भाव कमी आणि विकल्यावर वाढणारा भाव हे गणित सर्वांना ठावूक झाले आहे.

सर्वांनी आपल्या परीने अर्थशास्त्राचा उपयोग करून योग्य नियोजन करून बचत, घरखर्च, पुढील योजनांसाठी पैसे नियोजन करून या शास्त्राचा वापर करावा.

**श्री. हिरलाल लुणावत**

---

**जीवन हे फुलपाखरा सारखे असावे,**
**पण ध्येय मात्र मधमाशी**
**सारखे असावे.**

# महिला सबलीकरण

जगातील कोणतीही स्त्री ही विश्वविद्यालयाची सुंदर प्रतिकृती असून ती माता, भगिनी, गृहिणी या रूपामध्ये समाजात वावरताना दिसते. पुर्वीपासून विशेषतः भारतामध्ये स्त्रियांचा विचार केला असता, स्त्रीला देविचे रूप समजून तिला मान दिला जातो. ज्या घरात स्त्रीला न्याय, सदाचार मिळत असतो, तो समाज, ते कुटुंब प्रगतशिल राहते. पण त्या कुटुंबातील लहान थोर व्यक्ती नेहमी आनंदी राहत स्वतःची कुटुंबाची प्रगती करत असतात.

प्राचीन कालखंडापासून किंवा शेतीचा शोध लागला तेंव्हा पासून स्त्रीच्या बाबतीत विचार केला असता. स्त्रियांना शेतीत बी पेरून तिचे अस्तित्व निर्माण केले. याशिवाय प्राचीन कालखंडामध्ये स्त्रियांना वेदांचा अभ्यास करून पुरूषांच्या बरोबरीने सहभागी होवून स्वतःचे अस्तित्व निर्माण केलेले आहे. उदा. वेद - उपनिषदांत बरोबरीने सहभागी स्त्रिया म्हणजे आपल्या, हौसा, मैत्री, गार्गी यांसारख्या विदुषी स्त्रियांचा उल्लेख करता येईल.

कालांतराने जसजसा काळ बदलत गेला तशी परस्थिती बदलून पुरूषांनी स्त्रीला चुलीपुढे ठेवून चुल व मुल हे कार्यक्षेत्र मर्यादित केले. याला कारण पुरूषी अहंकार सांगता येईल.

अव्वल इंग्रजी कालखंडाचा विचार केला असता विविध समाजसुधारक जन्माला आले. उदा. धो. के. कर्वे यांच्या मते '' जेथे स्त्रियांचा आदर होतो, तेथेच देवी देवतांचा निवास असतो.'' नीती, न्यायाची, सदाचाराची शिकवण माताच बालकाला देत असते. स्त्रियांचा मानसन्मान राखणे हे समाजाचे कर्तव्य आहे., ज्या देशात स्त्रिया, सुसंस्कृत, सदाचारी असतात. ते राष्ट्र प्रगतीपथावर असते. या वरून स्त्री शिक्षणाची नितांत गरज होती व आहे हे लक्षात येवून जाते. शिक्षणामुळे माणसांची प्रगती होते हे लेखणीच्या माध्यमातून दाखवून दिले. याशिवाय महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाची क्रांती घडविली. स्त्रीला शिक्षणामुळे होणाऱ्या विविध त्रासांपासून मुक्ती मिळू शकेल. असा विश्वास निर्माण केला. सावित्री - ज्योती जीवनसाथी या जोडीने संपूर्ण शिक्षणाचे महत्व पटवून दिले. आज समाजात ज्या शिकलेल्या स्त्रिया आहेत, त्या सावित्रीबाईंच्या प्रयत्नामुळे सांगता येईल.

इंग्लंडसारखा बलाढ्य देशाचा विचार केला असता. तेथिल स्त्रियांना मतदानाचा हक्क संघर्ष करून मिळवावा लागला. आज आपण भारतासारख्या विकसीत राष्ट्रांचा विचार केला तर पंतप्रधान, राष्ट्रपती, शास्त्रज्ञ, समाजसेविका, क्रिडा, राजकारण, अर्थकारण विविध क्षेत्रांत स्त्रियांनी नावलौकीक मिळवून देशाचे नांव उज्वल केले आहे. इंदिरा गांधी, झाशीची राणी, कॅप्टन लक्ष्मी, प्रतिभा पाटील, डॉ. किरण बेदी, कल्पना चावला, सुनिता विल्यम, सिंधुताई सपकाळ, डॉ. आनंदीबाई जोशी यांचा जरूर उल्लेख करता येईल. या शिवाय समाजाचा त्रास सहन करूनही संत परंपरेतील संत जनाबाई, मिराबाई, संत कान्होपात्रा आपले कार्य करीत राहिल्या.

वीर शिवाजींना घडविण्याचे सामर्थ्य जिजाऊनी केले. जिजाऊ नसत्या तर हिंदवी स्वरा-

ज्याचे संस्थापक शिवाजीही घडले नसते.

भारतासारख्या विकसीत राष्ट्राचा विचार करत असताना आजच्या काळामध्ये दहशदवादां इतके विचीत्र परिस्थिती स्त्रियांवर होणारे अन्याय अत्याचार सांगता येईल. हुंडाबळी, स्त्रि-भ्रुणहत्या या समस्याही पुन्हा समाजात घडताना दिसतात. हि विचीत्र परिस्थिती बदलण्यासाठी समाजाने जागृत होऊन सतत विरोध केला पाहिजे. ज्या ज्या ठिकाणी वरील घटना घडतील त्या ठिकाणी कायदा व सत्य परिस्थितीची जाणीव करून दिली पाहिजे, कारण निसर्गाने स्त्रि कोणत्याही प्रकारचे दुःख सहन करू शकते. यावरून स्त्री ही पुरूषापेक्षा काकणभर श्रेष्ठ आहे हे लक्षात येते.

**प्रा. बोंबे सुनिता दत्तात्रय**
**(गांधी महविद्यालय, कडा)**



**स्वप्नं थांबली की**
**आयुष्य संपते ...**
**विश्वास उडला की**
**आशा संपते ...**
**काळजी घेणे सोडले की**
**प्रेम संपते ...**
**म्हणून स्वप्नं पहा**
**विश्वास ठेवा ...**
**आणि काळजी घ्या,**
**आयुष्य खुप सुंदर आहे...**

# भारतातील थेट विदेशी गुंतवणुक (FDI)

आधुनिक जागतिकीकरणाच्या वातावरणात थेट विदेशी गुंतवणुकीला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. जगातील सर्वच देशांना आर्थिक विकास आणि आर्थिक वृध्दीची पातळी उंचावण्यासाठी वा टिकवण्यासाठी थेट विदेशी गुंतवणुकीची आवश्यकता भासत आहे. थेट विदेशी गुंतवणुक हा दिर्घकालीन भांडवली हालचालींचा प्रकार आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या तांत्रीक तज्ञ गटाच्या मतानुसार जेव्हा एखाद्या देशातील कंपनी दुसऱ्या देशातील कंपनीमध्ये १० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त भांडवली गुंतवणुक करून भाग भांडवलांचे आधिग्रहन करते किंवा मताधिकार शक्ती प्राप्त करते तेव्हा त्याला थेट विदेशी गुंतवणुक असे म्हणतात.

भारतात १९९१ पासून थेट विदेशी गुंतवणुकिला दरवाजे उघडण्यात आले आहेत. आज मोजके उद्योग वगळता कोणत्याही उद्योगात १० टक्के पासून ते १०० टक्के पर्यंत थेट विदेशी गुंतवणुक करण्याची परवानगी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या स्वयंचलीत मार्गाने आणि भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या सरकारी मान्यता मार्गाने देण्यात येत आहे. भारत सरकारच्या उदार धोरणाबरोबर भारतातील उपभोक्त्याची मोठी संख्या वाढते राष्ट्रीय व दरडोई उत्पन्न बदलत्या आवडी निवडी विकसनशील नाणेबाजार व भांडवल बाजार नैसर्गिक व मानवी संसाधकाची सहज उपलब्धता वेगाने

विकास साध्य करणारी वाहतुक व दळणवळण व्यवस्था इत्यादी व्यवसायीक पर्यावरणाचा सकारात्मक परिणाम म्हणुन गेल्या दशकात भारतातील थेट विदेशी गुंतवणुकीच्या अन्नप्रवाहात वाढ झाली आहे.

थेट विदेशी गुंतवणुकीच्या माध्यमातुन देशात भांडवल, तंत्रज्ञान, तंत्रज्ञ, व्यवस्थापन यांचे आगमन होते. आणि त्याचा देशाच्या आर्थिक विकासावर सकारात्मक प्रभाव पडतो. हे लक्षात घेऊन सरकारने थेट विदेशी गुंतवणुकींच्या आंतरप्रवाहात वाढ करण्यासाठी आर्थिक सुधारणा काळात अनेक प्रयत्न केले आहेत. आज सट्टेबाजी, बिटींग व लॉटरी व्यवसाय चिट फंड, निधी कंपनी, अनुऊर्जा आणि किरकोळ व्यापार हि क्षेत्रे वगळता भारतातील कोणत्याही उद्योग व्यवसायात विदेशी गुंतवणुकदार, बहुराष्ट्रीय कंपणी आणि अनिवासी भारतीयांना १० टक्के पासून ते १०० टक्के पर्यंत थेट विदेशी गुंतवणुक करण्याची परवानगी आहे.

भारतातील आर्थिक सुधारणा, उद्योग जगताचा सकारात्मक दृष्टीकोन मानवी संसाधकाचा उंचावणारा दर्जा पायाभुत संसदेचा वाढता विस्तार वित्तीय आणि विमा क्षेत्राचा विकास आणि विस्तार या सर्वांचा एकत्रीत परिणाम म्हणुन भारताच्या स्थुल देशांतर्गत उत्पादनांत गेल्या दशकात समाधानकारक वाढ झाली आहे. थेट विदेशी गुंतवनुकीबाबतचे सरकारने अनुकुल धोरण आणि व्यवसायीक पर्यावरणाच्या अनुकुलतेचा परिणाम म्हणुन भारतातील विदेशी गुंतवणुकीच्या अंतरप्रवाहात वाढ झाली आहे.

**प्रा. मदन मार्कंडे**
**(वाणिज्य विभाग)**

# भारतीय उद्योग

कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था ही देशातील औद्यागिक विकासाच्या पातळीवर अवलंबुन असते. उद्योगाच्या स्थान निश्चीतीसाठी जे घटक कारणीभुत असतात त्यांना उद्योगांच्या स्थानिकी घटकांचे घटक म्हणतात. उदा. कच्चा माल, ऊर्जा, वाहतुक सोय, बाजारपेठ, कुशल कामगार, भांडवल, शासकिय धोरण, अनुकुल हवामान, मुबलक पाणी.

* स्थानिकीकरणानुसार उद्योगाचे वर्गिकरण दोन प्रकारे पडतात.

**अ) कच्च्यामालाच्या सानिध्यातील उद्योग** - उदा. लोह पोलाद प्रकल्प, लाकुड कटाई, गिरण्या, साखर कारखाने, दुध संघ, आदी.

**ब) बाजारपेठेच्या सानिध्यातील उद्योग** - उदा. वस्त्रोद्योग, हातमाग इ.

* शेतीमालावर आधारीत उद्योग

आपण थोडक्यात भारतीय उद्योगांची माहिती घेऊया.

**१) सुती वस्त्रोद्योग** - वस्त्रोद्योग हा भारतातील प्राचीन उद्योग आहे. १८५४ मध्ये कौसाजी नाना मॉय यांनी भारतातील पहिली कापड गिरणी मुंबईत सुरू केली हिच वस्त्रोद्योग तसेच यापुढील अन्य उद्योगांची सुरवात मानली जाते.

**सुती वस्त्रोद्योग विस्तार** - भारतात अनेक ठिकाणी वस्त्रोद्योग आहे. महाराष्ट्र, गुजरात, तमिळनाडू, उत्तर प्रदेश, आध्र प्रदेश, कर्नाटक, मध्य प्रदेश, व पश्चिम बंगाल येथे वस्त्रोद्योग आहे. महाराष्ट्र, गुजरात अन तमिळनाडू ही राज्य सुती वस्त्रोद्योगात अग्रनिय आहे.

**२) साखर उद्योग** - ऊस हा कच्च्या माला-

मालावर आधारीत आहे. देशातील तिसऱ्या क्रमांकाचा मोठा उद्योग आहे. देशातील एकूण कारखान्यांपैकी महाराष्ट्रात सर्वाधीक साखर कारखाने आहेत. भारत हा जगातील सर्वांत मोठा साखर उत्पादक व उपभोक्ता देश आहे. महाराष्ट्रात १९४९ साली प्रवारानगर लोणी येथे पहिला सहकारी साखर कारखाना सुरू झाला.

**३) ताग उद्योग** – भारतात पहिली ताग गिरणी १८५५ साली कोलकत्ता जवळ रिश्रा येथे सुरू झाली. पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, आध्र प्रदेश या राज्यांत ताग उद्योग मोठया प्रमाणात चालतो. पश्चिम बंगाल हे राज्य ताग उद्योगात देशात आघाडीवर आहे.

**४) रेशीम उद्योग** – नैसर्गिक रेशीम उद्योगात भारताचा, चीन नंतर जगात दुसरा नंबर आहे. भारतात तसर, रवी, मुग, तुती या चार प्रकारचे रेशीम उद्योग आहेत. कर्नाटक राज्यांत सर्वात जास्त रेशीम उद्योगांचा विस्तार झालेला आहे.

**५) लोह पोलाद उद्योग** – अवजड स्वरूपामुळे या स्वरूपाचे स्थानीकिकरण कोळसा क्षेत्राजवळच होतो. भारतातील पहिला आधुनीक लोह पोलाद कारखाना १८७० मध्ये पश्चिम बंगाल मधील 'कुल्टी' येथे सुरू झाला.

**कु. पवळ कोमल**
**द्वितीय वर्ष विज्ञान**

---

**बडा आदमी होना अच्छी बात है ।**
**लेकिन सच्चा और अच्छा आदमी होना**
**ये सबसे बडी और अच्छी बात है ।**

# भारतीय शेती

भारत हा कृषी प्रधान देश आहे. भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात शेतीचा १६ टक्के हिस्सा अहे. इ.स. २०११ च्या जनगननेनुसार ५८ टक्के लोकसंख्या शेती या क्षेत्रावर अवलंबुन आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत बि-बीयाणे, खते, औजारे, यांच्या किंमतीत वाढ झालेली आहे. भारतात शेती (इ.स.पुर्व ३०००) पासून मानव करत आहे. भारतातील लोकांची शेती हा मुख्य व्यवसाय आहे. शेतीमध्ये वेगवेगळ्या प्रकारची पिके घेतली जातात.

भारतात शेती बरोबर पशु पालन ही केले जाते. शेती पदार्थांचे उत्पादन हे संयुक्त उत्पादन आहे. शेती उत्पादन नैसर्गिक व जैविक प्रक्रीयेने होते. त्यामुळे मानवाला त्यावर नियंत्रण करण्याची जास्त गरज भासत नाही. शेतीमध्ये जमिन, हवा, पाणी या घटाकांचा समावेश जास्त प्रमाणात आहे. शेतीतील पिकांसाठी जमिनीचा वापर करतात. जमिनीचे संरक्षण योग्य रितीने होईल. याची काळजी घ्यावी लागते. जर मानवाने जमिनीचे रक्षण योग्य पद्धतीने घेतले नाही, तर जमिनीतील पिकांवर परिणाम होतो. शेतीमध्ये जमिनीत कोणते पिके कोणत्या प्रमाणात आणि केंव्हा काढावेत. या संबंधी आपल्याला योग्य निर्णय घ्यावा लागतो. शेतीमध्ये प्रत्येक पिकांच्या बाबतीत उत्पादन काळ वेगवेगळा असतो. व त्यावर निसर्गाच्या मर्यादा असतात.

भारतात लोकांना शेतीद्वारे रोजगार मिळतो. भारतातील औद्योगीक केंद्रांना लागणारा कच्चा माल शेतीतुन पुरविला जातो. त्यामुळे भारताच्या औद्योगिक प्रगतीला चालना मिळाली आहे. भारतातील

जवळ जवळ ८० टक्के जमिन खाद्य पिके, डाळी, आणि भरड धान्या करीता वापरली जाते. भारतात खाद्य पिकांखालील जमिनीचे प्रमाण जास्त असल्यामुळे भारतातील खाद्यान्नाचे उत्पादन जास्त आहे. भारतात शेतीमधुन थोड्या प्रमाणात जनावरांसाठीही खाद्य पुरवठा केला जातो.

भारतातील रेल्वे व रस्ते वाहतुक मोठ्या प्रमाणात शेती उत्पादनाच्या माल वाहतूकीवर अवलंबुन आहे. त्यामुळे भारतात वाहतूक व्यवसायाची प्रगती झाली आहे. भारतात चालणारा अंतर्गत व्यापार बहुतांशी शेती मालावरच आधारीत आहे. शेतीपासून पक्क्या मालाच्या स्वरूपात २० टक्के माल असतो. भारतात एकूण क्षेत्रफळाच्या ४५ टक्के भागावर शेती होते. भारतात जास्तीत जास्त शेती मैदानात, नद्यांच्या खोऱ्यात व पठारावर होते. पर्वतीय भागामध्ये शेतीचे प्रमाण सर्वांत कमी आहे.

भारतातील शेती पुर्णपणे मान्सुनवर अवलंबुन आहे. मौसमी पर्जन्य कधी कमी तर कधी जास्त होते. त्यामुळे त्याच्यावर अवलंबून असलेली शेतीचे नुकसान होते. पिकाची चांगल्या प्रकारे वाढ करण्यासाठी शेती मध्ये सतत पाणीपुरवठा असला पाहीजे. भारतात शेतीचा आकार फारच लहान म्हणजे ६ हेक्टर आहे. भारतात लोकसंख्या जास्त असल्यामुळे भारतातील दर माणसी जमिनीचे प्रमाण कमी आहे.

भारतात विविध प्रकारची पिके घेतली जातात. भारताचे हवामान मौसमी प्रकारचे असले तरी प्रत्येक भागातील हवामान परस्थीतीत भिन्नता आढळते. त्यामुळे प्रत्येक भागात वेगवेगळी पिके होतात. शिवाय शेतीच्या पद्धतीतही भिन्नता आढळते. भारताच्या काही भागात वर्षातून एकच पिक घेतले जाते. तर काही भागात दोन ते तिन पिके घेतली जातात.

भारतातील ८८ टक्के जमिन ज्वारी, गहू, तांदुळ इ. पिकांखाली आहे. भारताच्या एकूण क्षेत्रफळाच्या ५५ टक्के जमिन शेतीयोग्य आहे. पण यापैकी ४५ टक्के जमिन लागवडीखाली आहे. भारतात शेतीमध्ये जुन्या पद्धतीची अवजारे वापरली जातात. भारतात उदरनिर्वाहाचे साधन म्हणून शेतीकडे पाहिले जाते. व्यापारी पद्धतीने आजही शेती होत नाही. भात हे भारतातील मुख्य पिक आहे. भाताच्या पिकांसाठी भारतातील ३० टक्के जमिन वापरली जाते. चीन नंतर भारताचा भात उत्पादनांत क्रमांक लागतो. जगाच्या २० टक्के भाताचे उत्पादन भारतात होते. खाद्य पिकांबरोबर भारतात गळीताच्या धान्याला महत्व आहे. भारताच्या एकूण २० टक्के जमिन जलसिंचनाखाली आहे. भारतात रोखीच्या पिकांचेही मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. उदा. ऊस, तंबाखु, कापूस इ. भारतात चहा, कॉफी, रबर यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. भारतात आसाम मध्ये चहाचे मोठया प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. कर्नाटकमध्ये कॉफी तर केरळमध्ये रबर या पिकांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे.

**प्रा. डॉ. रमेश आबदार**
**(प्राणिशास्त्र विभाग प्रमुख)**

# भारताचा विदेशी व्यापार

स्वातंत्र्यपुर्व काळात भारतातून कच्चा माल, खनिज संपत्ती, अन्नधान्य इ. मोठ्या प्रमाणावर इंग्लंडसारख्या देशांना निर्यात होत असे. त्यामधुन तयार झालेला उत्पादित माल भारतामध्ये आणून विकण्यात येई. स्वातंत्र्यानंतर या स्थितीत बराच फरक पडला. आता भारत उत्पादित माल निर्यात करू लागला आहे. पण तो अविकसीत, विकसनशिल देशांना ! अजुनही भारतास यंत्रसामुग्री, विविध वस्तू प्रसंगी अन्नधान्य यांची आयात करावीच लागते. निर्यात वाढीचे अनेक प्रयत्न करूनही त्यामध्ये लक्षणीय अशी वाढ झालेली नाही. निर्यात मालाची किंमत त्याचा दर्जा, निर्यात करीत असलेला माल या बाबतीतील चित्र उदार आर्थिक धोरण स्विकारल्यानंतरच्या अलिकडील काही वर्षाचा उपवाद वगळता निराशजनक नसले तरी फारसे प्रोत्साहकही नाही. आयात कमी करण्याचे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरलेले तरी फारसे प्रोत्साहकही नाही. आयात कमी करण्याचे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरलेले आहेत. आयातीला पर्याय शोधण्यातही फारसे यश आलेले नाही. त्यामुळे परकिय चलनाची स्थीतीही गंभीर बनली होती. निर्यातील प्रोत्साहन देण्यासाठी, तसेच आयातीला प्रभावीपणे आळा घालण्यासाठी भारताने तिन वेळा रूपयाचे अवमुल्यनही केले. पण त्याचा फारसा फायदा होऊ शकला नाही. उलटपक्षी या अवमुल्यनाने आयात मालाची किंमत वाढून परकीय चलनाच्या साठ्यावर मात्र त्याचा विपरीत परिणाम झाला.

अर्थात अलिकडील काळात आयातीबरोबरच निर्यातही होत असलेल्या लक्षणीय वाढीमुळे व विशेषत्वाने सेवाक्षेत्रातील वृद्धीमुळे परकीय चलनाची आपली गंगाजळी वाढत चालली आहे. सन २००६-०७ या एकाच वर्षात आपल्या परकीय चलन साठ्यात ४.७६० कोटी डॉलर्सने भर पडली. त्यापैकी १.०९० कोटी डॉलर्सची भर डॉलर्सच्या तुलनेत इतर चलनांचे मुल्य वाढल्यामुळे पडली.

मार्च २००७ अखेर आपला परकीय चलनसाठा १९.९२० कोटी डॉलर्सवर पोहचला होता. मार्च २००७ अखेर असलेल्या या परकीय चलनसाठ्यात ११.५४० कोटी डॉलर्सची भर पडून मे २००८ अखेर हा चलनसाठा ३१.४६० कोटी डॉलर्सवर पोहचला.

पुढील काळात जागतिक मंदीमुळे आणि डॉलर बळकट होत गेल्यामुळे (आणि आपला परकीय चलनसाठा डॉलर मध्येच मोजला जात असल्यामुळे) आपल्या परकीय चलन साठ्यात घट होऊन मार्च, २००९ अखेर तो २५.२०० कोटी डॉलर्सपर्यंत घसरला.

परिस्थितीत काहीशी सुधारणा होऊन सन २००९-१० मध्ये आपल्या परकीय चलनसाठ्यात वाढ होत जाऊन मार्च २००९ अखेर आपला परकीय चलनसाठा २८.३५० कोटी डॉलर्सवर पोहोचला.

एप्रिल, २०१० अखेर आपल्या परकीय चलनामध्ये २९.२४० कोटी डॉलर्सची सीमा रेषा पार केली. तर डिसेंबर २०१० अखेर आपला २९.७३० कोटी डॉलर्सची मर्यादा ओलांडली. अर्थात, परकीय चलन साठ्यात झालेल्या या वाढीत डॉलर घसरल्यामुळे

झालेल्या मुल्यवृद्धीचा भाग अधीक होता.

पुढे काही निवडक देशांचा माहे. डिसेंबर २०१० मधील (चिनचा जून २०१० मधील) परकीय चलनसाठा नमुद केला आहे. त्यावरून आपण नेमके आहोत तरी कोठे, ते लक्षात यावे !

चीन २.४५.४३० कोटी डॉलर्स

जपान १.११.८८० कोटी डॉलर्स

रशिया ४७.९४० कोटी डॉलर्स

भारत २९.७३० कोटी डॉलर्स

कोरीया २९.३५० कोटी डॉलर्स

जर्मनी २१.६६० कोटी डॉलर्स

फ्रान्स १८.८३० कोटी डॉलर्स

इटली १५.७४० कोटी डॉलर्स

परकीय चलनसाठ्यात विचार करता, भारत हा चौथ्या क्रमांकाचा सर्वांत मोठा परकीय चलनधारक देश ठरतो.

- पांडुळे अजिनाथ (TYBA)
अर्थशास्त्र



" I don't believe in taking right decisions..
I take decisions & then make them right ..."
So always believe in ur ability & efforts..."

# भारतीय बेरोजगारी

**बेरोजगारीचे प्रकार :-**

भारतातील बेरोजगारीसंदर्भात धावता उल्लेख यापूर्वी आलेला आहेच. भारतातील बेरोजगारीचे सर्वसाधारणपणे ग्रामिण बेरोजगारी व नागरी बेरोजगारी असे दोन भाग पडतात.

**१) खुली बेरोजगारी -** या प्रकारच्या बेरोजगारीस इंग्रजीमध्ये "Open Unemployment" या संज्ञेने ओळखले जाते. या प्रकारच्या बेरोजगारीत काम करण्याची क्षमता व इच्छा असूनही रोजगार मिळू शकत नाही. अशा प्रकारच्या बेरोजगारांमध्ये रोजगारीसाठी ग्रामिण भागातुन शहरात आलेल्या बेरोजगारांचा व सुशिक्षीत बेरोजगारांचा समावेश होतो.

**२) कमी प्रतीची रोजगारी -** शहरी भागातील रोजगारांचा हा प्रकार काहीशा प्रमाणात ग्रामिण भागातील न्यून रोजगाराप्रमाणेच आहे. ज्या वेळी एखादी व्यक्ती आपल्या क्षमतेपेक्षा कमी काम करते. किंवा तिला तसे करणे भाग पडले अथवा ज्या वेळी एखाद्या व्यक्तीच्या कार्यक्षमतेचा पुरेपूर वापर होत नाही. वा करून घेतला जात नाही. त्या वेळी अशा प्रकारची बेरोजगारी आढळते. एखाद्या अभियंत्यास एखाद्या पदव्युत्तर पदवीधारकास एखाद्या संस्थेत लिपीकाचे काम करावे लागते. ही या प्रकारच्या बेरोजगारीची उदाहरणे होत.

**३) सुशिक्षीत बेरोजगार -** या प्रकारची बेरोजगारी प्रामुख्याने शहरी भागात आढळते. सुशिक्षीत बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

बेरोजगारीची कारणे –

आपल्या देशात आढळुन येणाऱ्या बेरोजगारीची कारणे स्थुलमानाने खालीलपणे सांगता येईल.

**१) अर्थव्यवस्थेतील मंद सुधारणा** – आपला देश विकासाकडे वाटचाल करीत आहे. हे निःसंशय परंतु या विकासाचा दर अतिशय अल्प आहे. आजही देशातील काम करू शकणाऱ्या वयोगटातील दोन तृतीयांशहून अधीक लोक शेतीव्यवसायात गुंतलेले आहेत. हे आपल्या आर्थिक विकासाचा वेग किती धिमा आहे, याचे बोलके उदाहरण आहे. औद्योगिक क्षेत्रातही आपण विकासाचे अपेक्षित उद्दिष्ट्ये गाठु शकलो नाही.

**२) अपुरे तंत्रज्ञान** – अपुरे तंत्रज्ञान किंवा पुरेशा तंत्रज्ञानाचा अभाव हे देशातील बेरोजगारीचे आणखी एक कारण सांगता येते. अपुऱ्या तंत्रज्ञानामुळे औद्योगिक विकासाचाच नव्हे तर कृषी उत्पादनाचाही अपेक्षीत वेग साध्य करता येत नाही. व त्यामुळे रोजगाराच्या संधी पुरेशा प्रमाणात वाढू शकत नाहीत.

देशातील सध्याची शिक्षणपद्धती ही ब्रिटीशांनी निर्माण केलेली शिक्षणपद्धती आहे. ब्रिटीशांनी ही शिक्षणपद्धती मुलतः हिंदी जनतेतुन मुलकी वा सनदी नोकर निर्माण करण्यासाठी सुरू केली होती. ही शिक्षणपद्धती रोजगारमुख अशा स्वरूपाची नसल्याने या शिक्षणपद्धतीतून स्वयंरोजगार निर्माण करू शकणारे सक्षम तरूण निर्माण न होता या शैक्षणिक पद्धतीतुन कारकुनी नोकरीची इच्छा व क्षमता असलेले तरूणच तयार होत असून त्यामुळे वाढत्या बेरोजगारीत केवळ भरच पडत नांही.

सोनवणे पंकज प्रेमचंद

द्वितीय वर्ष विज्ञान

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मजुरविषयक विचार

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नाव जगातील काही विव्दानांपैकी एक आहे. ते फक्त एक व्यक्ती नाही तर एक विचारप्रवाह आहे. समतेचा, स्वातंत्र्याचा आणि बंधुतेच्या विचारांवर मार्गक्रमण करणाऱ्या लोकांनी आज यशाची शिखरे गाठलेली आहे.

कामगार नेता, मजुर मंत्री आणि स्वतंत्र मजुर पक्षाचा संस्थापक या भुमिकांमधुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेतकरी, कामगार व मजुरांना न्याय मिळवुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

कामगार नेता म्हणुन डॉ. बाबासाहेब आबंडेकरांनी आपली भुमिका पार पाडली. शेतकऱ्यांचे हित साध्य करण्यासाठी मुंबई विधीमंडळात एक विधेयक मांडले. शेतजमिन कसणाऱ्या कुळांची गुलामगिरी नष्ट करणाऱ्याच्या हेतुने प्रांतिक विधीमंडळात अशा तऱ्हेचे विधेयक मांडणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पहिलेच सदस्य होते. खोती नष्ट होईन कुळांना जमिनीचे स्वामित्व मिळावे हा त्यांच्या विधेयकाच्या मुख्य हेतु होता. परंतु राज्यकर्त्यांनी हे विधेयक मंजुर होऊ दिले नाही. त्यानंतर त्यांनी महार वतन विधेयक सुध्दा मांडले. परंतु ते ही शेवटपर्यंत संमत झाले नाही.

डॉ. बाबासाहेबांचा कम्युनिस्ट कामगार चळवळीला विरोध होता. कारण कम्युनिस्ट हे आपले राजकिय ध्येय साध्य करण्यासाठी कामगारांचा केवळ वापर करतात. त्यामुळे कामगारांचे हित साध्य होत नाही असे बाबासाहेबांचे मत होते. त्यांनी काँग्रेस पक्षाला सुध्दा समाजवादाच्या बुरख्याखाली भांडवलशाहीला

खतपाणी घालणारा पक्ष ठरविले होते. कारण कॉंग्रेस पक्ष वर वर जरी समाजवादाच्या गोष्टी करीत असला तरी या पक्षात धनिकांचा जास्त भरणा असल्यामुळे कामगार व श्रमिकांनी आपल्या कल्याणासाठी कॉंग्रेस पक्षावर अवलुंबन राहणे मुर्खपणाचे होईल असे ते मानत. त्यांनी स्वतंत्र मजुर पक्षाची स्थापनी केली. कारण त्यांना कामगार, शेतकरी व मजुरांना न्याय मिळवुन द्यायचा होता. व एक सक्षम राजकिय पर्याय म्हणुन हा पक्ष बळकट करायचा होता.

शेतकऱ्यांची गाऱ्हाणी सरकारच्या समोर मांडण्यासाठी त्यांनी एक मोर्चा काढला होता. डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांना जाऊन भेटले व त्यावेळी त्यांनी एक निवेदन मुख्यमंत्र्यांना दिले त्या निवेदनामध्ये शेतावर काम करणाऱ्या मजुरांचे किमान वेतन ठरविणे, महसुल करात ज्याप्रमाणे सुट देण्यात येते त्याप्रमाणे थकलेल्या भाड्याच्या पैशात सुट द्यावी. मालकांना भरपाई देऊन इनामदारी आणि खोति या पद्धती नष्ट करण्याबाबत ताबडतोब कायदा करावा, सामाजिक दृष्ट्या जुलमि व आर्थिक दृष्ट्या कुचकामी ठरलेली जमिनदारी पध्दत संपुष्टात आणली पाहिजे, लहान शेतकऱ्यांना कालव्याच्या पाण्याचे दर निम्मे करावेत, इत्यादी मागण्यांचा समोवश होता. त्यावेळी शेतकरी, कामगार, मजुरांना उद्देशुन भाषण करतांना त्यांनी आवाहन केले की, शेतकरी, कामगार, मजुर यांनी आपल्या दैन्याची कारणे त्यांची पिळवणुक करणाऱ्या श्रीमंतीत आहे. त्यामुळे त्यांनी निरपेक्ष बुध्दीने मजुराची एक आघाडी निर्माण करावी.

१९३८ ला मुंबई विधीमंडळात औद्योगिक कलहाचे विधेयक चर्चेसाठी मांडले गेले. त्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कडाडुन विरोध केला. या विधेयकानुसार विशिष्ट परिस्थितीत संप करणे बेकायदेशिर ठरविले गेले होते. हे विधेयक कामगारांच्या संप करण्याच्या हक्काला बाधा आणत होते.

कु. दुधावडे प्रिती
तृतिय वर्ष विज्ञान

**भारतीय पैसा (चलन)**



" Great minds
discuss ideas.
Average minds
discuss events.
Small mind
discuss people."

# महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना

भारत हा विकसनशील देश असुन शेती हा देशातील प्रधान व्यवसाय आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाले. त्यावेळी देशाची लोकसंख्या सुमारे ३५ कोटी इतकी होती. भारताचे पहिले पंतप्रधान स्व. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी रशियाच्या धर्तीवर आर्थिक नियोजनाच्या धर्तीवर आर्थिक नियोजनाच्या माध्यमातुन देशाचा विकास करण्याचे धोरण अवलंबले. स्वातंत्र्याप्राप्तीच्या वेळी भारतासमोर दारिद्रय, बेरोजगारी, अन्नधान्य टंचाई व वाढती लोकसंख्या अशा अनेक समस्या होत्या. देशाच्या ग्रामीण भागाचा विकास घडवुन आणल्याशिवाय सर्वंकष आर्थिक विकासाचे स्वप्न पुर्ण होणार नव्हते. म्हणुन राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांचे विचार डोळ्यासमोर ठेवुन नियोजनकरांनी आर्थिक विकासाबाबतचे विविध उपक्रम राबविण्यावर भर देण्याचे ठरवले होते. भारतीय स्वातंत्र्याच्या ६६ वर्षाचा आढावा घेतला असता, आजही देशासमोर वाढत्या लोकसंख्येमुळे विविध प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामधील सार्वत्रिक दारिद्रय व बेरोजगारीचे वाढते प्रमाण हे प्रमुख दोन प्रश्न मानता येतील. १९५० - ५१ मध्ये देशाची लोकसंख्या ३६.१ कोटी होती ती २०११ मध्ये १२१.२ कोटी पर्यंत वाढली. या लोकसंख्येमध्ये प्राथमिक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण १९५१ ते २०११ या काळात ७२.१ % वरून ५२.५% पर्यंत घटले. तर सेवाक्षेत्रात गुंतवलेल्या लोकसंख्येचे प्रमाण याच काळात १७.२% वरून २७.३% पर्यंत वाढले. याच कालावधीत वाढत्या लोकसंख्येबरोबर कर्त्या लोकसंख्येचे प्रमाण सुध्दा वाढत गेले. परिणामी पुरेशा प्रमाणात रोजगार संधी उपलब्ध न झाल्यामुळे बेरोजगार व्यक्तींच्या संख्येत वाढ झाली. आजही देशाच्या ग्रामीण व शहरी भागात पुरेशा प्रमाणात रोजगार संधी उपलब्ध न झाल्याने बरोजगारांचे तांडे वाढलेले दिसुन येतात. वाढत्या बेराजगारीचा परिणाम म्हणुन भारतीय अर्थव्यवस्थेसमोर अनेक आर्थिक व सामाजिक प्रश्न निर्माण झालेले दिसुन येतात. भारतासारख्या विकसनशील देशात बेरोजगारीच्या प्रश्नाचे गांभीर्य विचारात घेऊन व्यापक व व्यवहारवादी उपाययोजना करणे गरजेचे आहे.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४७ ते १९४९ या तीन वर्षाच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेचा समग्र अभ्यास करून देशाला दीर्घकाळापर्यंत मार्गदर्शन करेल अशी राज्य घटना तयार केली. भारतीय राज्यघटनेच्या ३१, ४१ व ४३ कलमांनुसार देशातील प्रत्येक नागरिकांना रोजगाराची हमी देण्याची तरतुद केली असुन त्यांची कार्यवाही राज्य शासनाने करावयाची आहे. इतकेच नव्हे तर प्रत्येक व्यक्तीच्या काम करण्याच्या हक्कास राजमान्यता देण्यात आली आहे. त्यादृष्टीने येथे येथे उल्लेख करण्यास अतिशय आनंद वाटतो की, महाराष्ट्र हे देशातील असे पहिले घटकराज्य कि, ज्या घटकराज्याने अकुशल कामगारांना कायद्यान्वये रोजगाराची हमी दिली आहे. १९७२ साली महाराष्ट्र शासनाने हि योजना स्विकारल्यानंतर केंद्र सरकारने जवाहर रोजगार योजना, पंतप्रधान रोजगार योजना,

सुशिक्षित बेराजगारांसाठी योजना, एकात्मिक ग्रामिण विकास योजना व राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना यांसारख्या विविध योजना संपुर्ण देशभरात अमलात आणल्या. भारतात वाढत्या बेराजगारीच्या संख्येबरोबर रोजगार संधी वाढविण्याच्या दृष्टीने ग्रामीण व शहरी भागात कायदेशीर मार्गाने या योजना कार्यान्वित करण्यात आल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेत नमुद केलेल्या कलमानुसार रोजगाराचा हक्क रोजगाराची मागणी करणाऱ्या १००% लोकांना आजही प्राप्त झालेला नाही. म्हणुन देशाची राज्यघटना व रोजगार मिळविण्याच्या हृक्क याबाबत विचारमंथन होणे गरजेचे आहे. देशातील विविध क्षेत्रात कुशल व अकुशल रोजगाराची मागणी करणाऱ्या समाजाचा विचार करणे आवश्यक आहे.

प्रा. तुकाराम गोंदकर
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)



First they ignore you
Then they lough at you.
Then they fight you.
Then you win.

# विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ)

भारतात आजही ७२% पेक्षा जास्त लोक ग्रामिण भागात राहतात. त्यांचे उपजिविकेचे मुख्य साधन शेती हेच आहे. या शेती क्षेत्रावर 'सेझ' (SEZ) या गोंडस कल्पनेने अतिक्रमण चालविले आहे आणि तेही सक्तीने, स्वच्छेने नव्हे.

खेड्यांकडे चला, ग्रामिण उद्योग सुरू करा. ग्रामिण भागांचा विकास करा, यांत्रिकीकरणाला फार महत्तव देऊ नका, ग्राम स्वराज्य, ग्रामिण विकास या महात्मा गांधी यांच्या तत्तवज्ञानाला आपण पुर्णतः तिलांजली दिली आहे असे म्हणजा येईल. ब्रिटिशपुर्व काळात सुध्दा भारतात शेतीत अनेक कुटीर, हस्तकला उद्योग होते. येथील कलाकुसरीच्या वस्तुंना मोठी बाजारपेठ होती. व्यापाराच्या निमित्ताने ईस्ट इंडिया कंपनी भारतात आली आणि राज्यकर्ता झाली. सामान्य लोकांची पिळवणुक करून आपल्या देशाच्या समृध्दीत भर घालणे इंग्लडने या काळात चालुच ठेवले होते. स्वातंत्र्यानंतर १९५१ ते १९५६ ह्या पहिल्या पंचवार्षिक योजनेपासुन सातव्या योजनेपर्यंत अर्थव्यवस्थेत जे काही बदल झाले ते इतके गतिशील किंवा स्पर्धात्मकही नव्हते पण १९९२-९७ च्या आठव्या पंचवार्षिक योजनेत आपण नविन आर्थिक धोरणाचा स्विकार केला आणि जागतिक बदल स्विकारले.

अमेरिका ही एक जागतिक पातळीवरील आर्थिक दृष्या महासत्ता आहे. जगातील काही अर्थव्यवस्था ह्या विकासाच्या मार्गावर तर काही त्या पुढील टप्प्यात म्हणजे वृध्दीच्या अवस्थेत आहेत. वृध्दीची अवस्था म्हणजे श्रीमंताने आपली श्रीमंती

अर्थव्यवस्था असुन आपली वृध्दीची अवस्था टिकवुन राहावी म्हणुन नवनवीन संकल्पना विकसित करून आपल्या जागतिक बँक व आतरराष्ट्रीय नाणेनिधी सारख्या दलालामार्फत विकसनशील देशांवर लादण्याचा प्रयत्न करीत आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताला विकासाची ओढ लागली. ह्याच दरम्यान १९४७ मध्ये आंतराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने गॅट करार करण्यात आला. ह्याच गॅट अंतर्गत त्याचे अध्यक्ष डंबेल ह्यांनी काही प्रस्ताव मांडले की जे महासत्तेच्या बाजुने झुकणारे होते. परंतु हे प्रस्ताव विकसनशील देशांनी स्विकारले पाहिजे, ह्या दृष्टीने मधल्या दलालांचे काम जागतिक बँक व नाणेनिधी यांनी केले व अजुनही करित असल्याने दिसुन येत आहे. याचाच परिणाम म्हणुन आपणास खाऊजा चा स्विकार १९९१ नंतर करावा लागला व हे सर्व करत असताना त्यांनी आपल्या दुबळेपणाचा व गरिबीचा फायदा घेतला की ते अगदी 'सेझ' पर्यंत सहज गेले.

'कंपनी सरकार' ही संकल्पना भारतीयांना नवी नाही. आजच्या ह्या स्वतंत्र देशात श्रीमंतांचे एक चंदेरी व झगमगीत जग व ज्यांच्या आधारावर ते ही झगमग जग व त्यांच्या आधारावर ते ही झगमग उपभोगत आहेत त्या कष्टकऱ्यांचे गरीब जग अशी दोन जगे तयार झाली आहेत व ह्या श्रीमंताना अधिक झटपट श्रीमंत होण्यासाठी गरीब समुहाकडे असणारी संसाधने (विशेषतः जमीन) झपाट्याने बळावण्याचा ध्यास लागला आहे. त्यासाठी नवनवीन कायदे अमलात आणले जात आहेत. त्यापैकीच एक म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र कायदा २००५.संसदेत हा कायदा कायम पारित केला गेला २३ जुन २००५ ला राष्ट्रीपतींनी मान्यता दिली व फ्रेब्रुवारी २००६ मध्ये त्याचे नियमही लागु करण्यात आले

विकासनशील देशाचा खऱ्या आर्थाने विकास करावयाचा असेल तर त्यांनी काय करावे ह्या बाबत वेगवेगळ्या अर्थतज्ज्ञांनी वेगवेगळे सिध्दांत मांडले आहेत. अर्थशास्त्राचे जनक ॲडम स्मिथ यांनी १७७६ मध्ये आपल्या राष्ट्रीय संपत्ती या ग्रंथात म्हटले आहे कि विकसनशील देशांच्या विकासासाठी शासनाने निरर्हस्तक्षेपी धोरणाचा स्वीकार करावा म्हणजे सर्वच क्षेत्रात शासनाचे लुडबुड नको कारण जन्माला येणारी प्रेत्येक व्यक्ती ही स्वार्थी असते. तिने स्वार्थाने प्रेरित होऊन जरी तिच्या हितातुन समाजाचे हीत साध्य होऊ शकते २३० वर्षानंतर आपल्याला ॲडम स्मिथ समजला असते म्हटले तरी त्याने सुचवलेला मार्ग व आपण स्विकारलेल्या खाऊजा व विआक्षे सारख्या संकल्पना एकाच दिशेने जातात का?

**प्रा. किशोर कोईनकर**
**(रसायनशास्त्र विभाग)**

**रूळलेल्या वाटेने जाणारे**
**बरेच जण असतात,**
**परंतु स्वतःची वाट**
**निर्माण करणारा एखादाच असतो...**
**नशीबवान तर सगळेच असतात,**
**नशीबालाही बदलणारा**
**एखादाच असतो...**
**जिंकणारे तर बरेच असतात,**
**पण हरून जिंकणारा एखादाच असतो...**

# Globalization and the English Language

It is true over a billion people in the world now speak English. According to a report titled, English Next by language researcher David Graddol., "...two billion people will be talking or studying English inside a decade." English is spoken everywhere. The Economist says, " English is the language of globalization of worldwide enterprise, politics. It is the language of computers and the Internet. It is the dominant intercontinental language in communications, science, aviation, amusement, radio and diplomacy". John Whitehead Director of the British Council suggests , " English is a crucial resource for operating on the entire world stage,". The potential to communicate and understand English is mandatory in certain fields, professions, and occupations. In reality, English is referred as, the "lingua franca". As the Graddol report demonstrates, the global unfold of English will guide to critical, financial and political drawbacks in the long term. Individual employees recognize the critical need to be skilled in Business English not only to perform their current job effectively, but also as it relates to their potential for career advancement . 93 % employees say that English is required or important to get a promotion. Skilled Business English communicators both save time accomplishing their daily tasks and are more effective in getting their overall jobs done. It shows that business English is likely to be continue to become more important-across all industries, organizational levels and parts of the world. An overwhelming number of employees agree that English is crucial both for their current job and for advancement. English is integrated into their daily work flow and used both inside and outside the company. But despites this recognized need, there is an enormous skills gap. Companies are scrambling to give their global team the training they need to complete successfully in the $21^{st}$ century.

